# क्रांतीज्योतीच्या धाडसाने देशात महिला साक्षरतेची क्रांती झाली:डॉ.संतोष कुटे



**मोताळा:**दिनांक ३ जानेवारी ला स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे अर्थशास्त्र, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत तक्रार समिती (महिला कक्ष) यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९१ वी जयंती साजरी करण्यात आली. या वेळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनिल मामलकर सर तर प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे सर श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती व डॉ. संतोष वुटे सर अध्यक्ष अर्थशास्त्र अभ्यास मंडळ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती या वेळी प्रमुख उपस्थिती मध्ये प्रा. विजय धुमाळ, प्रा. सौ. नंदा मास्कर, प्रा. चंदन राठोड, प्रा. अविनाश मेहेरकर हे उपस्थित होते. सावित्रीबाई फुले जयंती व राष्ट्रीय बालिका दिनाच्या कार्यक्रमात प्रत्येक मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर यथोचित प्रकाश टाकला. या वेळी कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रा. भास्कर भिसे, प्रा. दिनेश ढगे, डॉ. चित्रा मोरे, डॉ. प्रविण ठेंग, डॉ. अभय ठाकुर, डॉ. अरुण गवारे, डॉ. सुप्रिया बेहेरे, प्रा. धिरज चन्नेकर, प्रा. निलेश राहाटे, प्रा. दादा मनगटे, प्रा. शुभम साखरे, प्रा. पराग ब्राम्हणकर, प्रा. प्रतिक गायकी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची बैठकव्यवस्था रासेयो स्वयंसेवक, पुरुषोत्तम कुयटे व सुभाष धुरंधर, यांनी केली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. पुरुषोत्तम चाटे यांनी केले तर आभार डॉ. चित्रा मोरे यांनी मानले. या कार्यक्रमात रासेयो स्वयं सेवक व राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व महावीद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# विष मुक्त खेती का संकल्प करें- प्रा. डॉ. मामलकर



**तहसील संवाददाता** | मोताला

खेती को व्यवसायी दृष्टि से देखते हुए विष मुक्त खेती का प्रयोग करने हेतु युवा पहल कर विष मुक्त खेती का संकल्प करें, ऐसी सलाह प्रा. गजानन मामलकर ने किया। राष्ट्रीय किसान दिन २३ दिसंबर को स्थानीय श्री शिवाजी महाविद्यालय के अर्थशास्त्र विभाग की ओर से मनाया गया। किसानों के प्रश्नों पर देश के पूर्व प्रधानमंत्री तथा किसान नेता चौधरी चरण सिंह के जन्मदिन पर अर्थात २३ दिसंबर को देश में किसान दिन का आयोजन किया जाता है। इस कार्यक्रम में प्रा.विजय धुमाल ने भी विचार प्रकट किए। कार्यक्रम में गायत्री तेली, संजना हेलोडे, राधिका भगत, जयश्री तायडे, शालिनी गुले, दिनेश पट्ठे आदि छात्रों ने भी विचार व्यक्त किए।

इस अवसर पर प्रा.नंदा मास्कर, प्रा.चंदन राठोड, प्रा.अविनाश मेहेरकर, डॉ.चित्रा मोरे, डॉ.सुप्रिया बेहेरे प्रमुखता से उपस्थित थीं। प्रस्तावना अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.पुरुषोत्तम चाटे, संचालन पवन जाधव तथा आभार तेजस इंगले ने प्रकट किए।

# रसायनशास्त्र व अर्थशास्त्र विभाग यांचा अभ्यास दौरा संपन्न

**मोताळा:**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेवुन नोकरीच्या शोधात न फिरता स्वतः उद्योग व्यवसायात शिरुन नवीन रोजगार निर्माण करावेत याकरता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने अभ्यासक्रमात महाविद्यालयाने अभ्यास दौरे आयोजित करावेत असे नमूद केले आहे. त्याचाच भाग म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संलग्नित श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथील रसायनशास्त्र व अर्थशास्त्र विभाग यांच्या वतीने संयुक्तपणे अभ्यास दौरा १८ एप्रिल ला आयोजित करण्यात आला होता. सदर अभ्यास दौऱ्यासाठी जिल्ह्यातील खामगाव येथील पार्ले बिस्कीट कंपनीची निवड करण्यात आली होती. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील मामलकर यांनी अनुमती दिली. या अभ्यास दौऱ्यात अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. पुरुषोत्तम चाटे व रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. भास्कर भिसे यांनी अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले तर अभ्यास दौऱ्याचे समन्वयक म्हणून प्रा. नागेश गद्दुकार व प्रा. दादाराव मनगटे हे होते. अभ्यास दौऱ्यात महाविद्यालयातील ४०



विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. यावेळी पार्ले फॅक्टरी मध्ये मा. सचिन पाठक खाद्य ऑफिसर यांनी फॅक्टरी मध्ये बिस्किट तयार करण्याची प्रोसेस कशी असते त्याच प्रमाणे प्रत्यक्ष मशीन कशाप्रकारे मिक्सिंग नंतर ओव्हन मधून त्यानंतर कूलिंग पॅकिंग आणि डिस्ट्रीब्यूट कसे केले जाते याविषयी मार्गदर्शन केले त्याचबरोबर कंपनी मध्ये कशाप्रकारे कार्य चालते याची लघुफीत विद्यार्थ्यांनी पाहिली. प्रश्नोत्तरामध्ये विद्यार्थ्यांनी पॅकिंग विक्री व कच्चामाल यासंदर्भात प्रश्न विचारली याचे समाधानकारक उत्तर सचिन पाठक सर यांनी दिली शेवटी महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रदीप डिक्कर यांनी सर्वांचे आभार मानले.

# अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन संपन्न

## विद्यार्थ्यांनी रोजगार दाता बनणे काळाची गरज : प्राचार्य डॉ. विजय नागरे

मोताळा – स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे दिनांक ११ सप्टेंबर रोजी अर्थशास्त्र अभ्यास मंडळ उद्घाटन करण्यात आले. यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संस्थापक अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. गजानन जाधव अध्यक्ष व उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. विजय नागरे याची उपस्थिती लाभली. आपल्या उद्घाटनपर मनोगतामध्ये बोलताना डॉक्टर नागरे सर यांनी जीवनातील वास्तव अनुभव विद्यार्थ्यांसमोर कथन केले. तसेच आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर अर्थशास्त्र विषयाचे किती महत्त्व आहे याची माहिती दिली.

भविष्यात विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन रोजगार दाता बनणे ही काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले. अध्यक्ष मनोगता मध्ये डॉक्टर जाधव सर यांनी विद्यार्थ्यांनी मार्केटिंग कडे जास्तीत जास्त लक्ष देणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. अर्थशास्त्र मंडळाची कार्यकारणी मध्ये आरती बाभुळकर अध्यक्ष तर अंकित मेढे उपाध्यक्ष वैष्णवी सातव सचिव तर संजना



सोनवणे कोषाध्यक्ष तसेच सदस्य म्हणून जयपाल खंडारे, दीपक देशमुख, जीवन सरकटे मोनिका गुज्जर, भाग्यश्री इंगळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक पुरुषोत्तम चाटे यांनी केले.

त्यांनी वर्षभर अर्थशास्त्र अभ्यास मंडळाद्वारे घेण्यात येणारे उपक्रम आणि अभ्यास मंडळाची स्थापना करण्या पाठीमागची भूमिका विद्यार्थ्यांना सांगितली. कार्यक्रमाचे संचालन डॉक्टर अमृतकर सर तसेच आभार प्रदर्शन कु. आरती बाभुळकर यांनी केले. कार्यक्रमामध्ये छायाचित्रण प्रा. नागेश गट्टूवार यांनी केले , तांत्रिक सहाय्य प्रा. भास्कर भिसे व जितेंद्र किरसान यांनी केले, बैठक व्यवस्था प्रा. विष्णू भागिले, पुरुषोत्तम कुयटे, वासुदेव खाडे व महादेव सोनुने यांनी केली. या कार्यक्रमाला प्राध्यापक बंधू व मानवविद्या शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिव्य मराठी

बुलडाणा 14-09-2023

२

# विद्यार्थ्यांनी भविष्यात रोजगार दाता होणे काळाची गरज

## प्राचार्य डॉ. नागरे; अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना



कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. नागरे व्यासपिठावर उपस्थित मान्यवर.

**प्रतिनिधी | बुलडाणा**

आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर अर्थशास्त्र विषयाचे किती महत्त्व याची माहिती विशद केली. भविष्यात विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन रोजगार दाता बनणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. नागरे यांनी केले.

ते मोताळा येथील श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र अभ्यास मंडळ उद्‌घाटनावेळी सोमवार, दि. ११ सप्टेंबर रोजी बोलत होते. यावेळी शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संस्थापक अध्यक्ष डॉ. पंजाबराव देशमुख, संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. गजानन जाधव, अध्यक्ष व उद्‌घाटक म्हणून प्राचार्य डॉ. विजय नागरे यांची उपस्थिती लाभली होती.

आपल्या उद्‌घाटनपर मनोगतामधून डॉ. नागरे यांनी जीवनातील वास्तव अनुभव विद्यार्थ्यांसमोर कथन केले. तर अध्यक्ष मनोगतात डॉ. जाधव यांनी विद्यार्थ्यांनी मार्केटिंगकडे जास्तीत जास्त लक्ष देणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. यावेळी अर्थशास्त्र मंडळाची कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष आरती बाभुळकर, उपाध्यक्ष अंकित मेढे, सचिव वैष्णवी सातव तर कोषाध्यक्ष संजना सोनवणे, सदस्य म्हणून जयपाल खंडारे, दीपक देशमुख, जीवन सरकटे, मोनिका गुज्जर, भाग्यश्री इंगळे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. पुरुषोत्तम चाटे यांनी केले. त्यांनी वर्षभर अर्थशास्त्र अभ्यास मंडळाद्वारे घेण्यात येणारे उपक्रम आणि अभ्यास मंडळाची स्थापना करण्यामागची भूमिका विद्यार्थ्यांना सांगितली.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृतकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार आरती बाभुळकर यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. नागेश गट्टूवार, प्रा. भास्कर भिसे, जितेंद्र किरसान, प्रा. विष्णू भागिले, पुरुषोत्तम कुयटे, वासुदेव खाडे, महादेव सोनुने यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला प्राध्यापक व शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.